सूचना दिनांक : 16/01/2024

सर्व (SC) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, केंद्र शासनाने प्रेस नोट दिनांक 05/01/2024 नुसार अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना भारत सरकारने मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना लागू केलेली आहे .सदर योजनेअंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक 17 मार्च 2022 व दिनांक 07 जुलै 2023 या शासन निर्णयातून नमूद केल्यानुसार अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाची 60%टक्के हीश्याची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या आधार सलग्न बँक खात्यात जमा झाल्यानुसार विद्यार्थ्यांनी त्यांना अनुज्ञेय असलेली निर्वाह भत्त्याची रक्कम वजा करून उर्वरित शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क , इतर ना परताव्याचा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयात लवकरात लवकर जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत .

गेल्या काही दिवसापासून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची सन 2021- 22 व 2022 - 23 वर्षातील केंद्र शासनाची 60% टक्के रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार सलग्न बँक खात्यात जमा करण्याची कारवाई सुरू आहे. करिता ज्या विद्यार्थ्यांच्या खात्यात अशी रक्कम जमा झालेली आहे अथवा काही दिवसात जमा होणार आहे अशा विद्यार्थ्यांनी त्या रकमेमधून आपली(स्वतःची ) निर्वाह भत्त्याची रक्कम वजा करून उर्वरित शिक्षण शुल्क ,परीक्षा शुल्क व इतर शुल्क रक्कम महाविद्यालयात जमा करावी .

असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण हिंगोली यांच्या कार्यालयातर्फे करण्यात येत आहे याप्रमाणे कारवाई न केल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील याची गांभीर्याने सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी .

प्राचार्य

PRINCIPAL
Adarsh Education Society's
Arts, Commerce & Science College
HINGOLI Dist Hingoli

प्राचार्य/वि.नोटीस बोर्ड/अधीक्षक/एस.बिडवई/वेबसाईड

Scanned with OKEN Scanner